**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**महानगरपालिका वैद्यकीय कर्मचारी निवड मंडळ**

**<u>सहाय्यक प्राध्यापकांची पदे नियमित तत्वावर भरण्यासाठी जाहीरात</u>**

महानगरपलिकेच्या वैद्यकीय महाविद्यालये आणि उपनगरीय रूग्णालयातील खालील विषयातील `सहाय्यक प्राध्यापक' या संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरिता व प्रतीक्षा यादी बनविण्याकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर जाहीरात ही बृ.मुं.म.न.पा. वैद्यकीय महाविद्यालये आणि उपनगरीय रूग्णालयातील विविध विषयामधील `सहाय्यक प्राध्यापक' हया संवर्गातील रिक्त असलेली पदे नियमित तत्वावर भरण्यासाठी प्रसृत केलेली आहे. तद्अनुषंगाने खालील विषयांसाठी आरक्षणानुसार संबंधित प्रवर्गातील उमेदवारांनी अर्ज करावेत.

**(अ) <u>वैद्यकीय विशेष</u>**

| अ.क्र | विषय | रिक्त पदे | प्रवर्ग निहाय आरक्षण | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला |
| 1 | शरीररचनाशास्त्र | 1 | - | - | - | - | - | - | - | 1 | - |
| 2 | जीवरसायनशास्त्र | 3 | - | 1 | - | - | - | - | - | 1 | 1 |
| 3 | विकृतीशास्त्र | 2 | - | - | - | 1 | - | - | 1 | - | - |
| 4 | न्यायवैद्यकशास्त्र | 3 | - | - | 1 | 1 | - | - | - | - | 1 |
| 5 | सामाजिक वैद्यकशास्त्र | 7 | 1 | - | - | - | - | - | 1 | 1 | 4 |
| 6 | औषधवैद्यकशास्त्र | 15 | - | 2 | 1 | - | 2 | 1 | 1 | 4 | 4 |
| 7 | बालरोगचिकित्साशास्त्र | 3 | - | 1 | - | - | - | - | - | 1 | 1 |
| 8 | स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र | 8 | - | 1 | 1 | - | - | - | - | 2 | 4 |
| 9 | बधिरीकरणशास्त्र | 28 | - | 6 | 1 | 2 | 2 | - | 2 | 6 | 9 |
| 10 | मनोविकृतीशास्त्र | 2 | - | - | 1 | - | - | - | - | - | 1 |
| 11 | क्ष-किरणशास्त्र | 7 | 2 | 1 | - | - | - | - | - | - | 4 |
| 12 | त्वचा व गुप्तरोगशास्त्र | 4 | - | - | - | - | - | - | - | 2 | 2 |
| 13 | सर्वसाधारण शल्यचिकित्साशास्त्र | 6 | 1 | - | - | 1 | - | - | - | 1 | 3 |
| 14 | नेत्रशल्यचिकित्साशास्त्र | 2 | - | 1 | - | - | - | - | - | - | 1 |
| 15 | श्वसनविकारशास्त्र | 3 | - | 1 | 1 | - | - | - | - | - | 1 |
| 16 | जीवसांख्यिकीशास्त्र | 1 | - | 1 | - | - | - | - | - | - | - |
| 17 | रेडीओथेरेपी | 1 | - | 1 | - | - | - | - | - | - | - |
| एकूण | | 96 | 4 | 16 | 6 | 5 | 4 | 1 | 5 | 19 | 36 |

## (ब) वैदयकीय अतिविशेष

| अ क्र | विषय | रिक्त पदे | |
|---|---|---|---|
| 1 | हृदयरोगशास्त्र | 4 | महाराष्ट्र अधिनियम 2004 चा क्रमांक 8, नियम क्र. 3 (1) अ अन्वये पारित केलेल्या क्रमांक बीसीसी-2001 / 1897/ प्रक्र 64 / 2001 / 16 दिनांक-10.02.2004 नुसार अ.क्र. 1 ते 9 वरील शाखा अतिविशेष स्वरूपाच्या असल्यामुळे आरक्षण लागू नाही. |
| 2 | मज्जातंतूशास्त्र | 2 | |
| 3 | आंतरासर्गशास्त्र | 2 | |
| 4 | बालरोगशल्यचिकित्साशास्त्र | 4 | |
| 5 | मज्जातंतूशल्यचिकित्साशास्त्र | 1 | |
| 6 | उरोशल्यचिकित्साशास्त्र | 1 | |
| 7 | सुघटनशल्यचिकित्साशास्त्र | 2 | |
| 8 | मूत्रशल्यचिकित्साशास्त्र | 2 | |
| 9 | मूत्रपिंडरोपणशास्त्र | 1 | |
| एकूण | | 19 | |

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या परिपत्रक क्र. एमओएम / 10222 दिनांक- 07.03.2009 आणि परिपत्रक क्र. एमबीसी / 1517 दिनांक- 02.01.2009 नुसार अनुक्रमे खेळाडूंसाठी 5 टक्के व महिलांसाठी 30 टक्के प्रमाणे पदे आरक्षित आहेत.

- शारीरिकदृष्टया अपंग उमेदवाराकरिता 3 टक्के आरक्षणांतर्गत चलनवलन विषयक विकलांगता प्रवर्गातून सदर पदे गुणवत्तेनुसार भरण्यात येतील. अपंगांच्या अनुशेषांतर्गत भरावयाची पदे ही एकूण रिक्त पदात दर्शविण्यात आली आहेत.

- महिलांसाठी 30 टक्के प्रमाणे आरक्षित पदे शासन नियमानुसार भरण्यात येतील. तथापि एखादया प्रवर्गात त्या प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पद त्या प्रवर्गाच्या पुरूष उमेदवारांमधून भरण्यात येईल.

- खेळाडूंकरिता 5 टक्के आरक्षित पदे शासन नियमानुसार भरण्यात येतील.

**विषयनिहाय सामाजिक, समांतर व अपंग आरक्षण खालीलप्रमाणे आहे.**

| सामाजिक आरक्षण | | अजा | | अज | | विजा (अ) | | भज (ब) | | भज (क) | | भज (ड) | | विमाप्र | | इमाव | | खुला | | एकूण | | | एकूण | अपंग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| समांतर आरक्षण | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| अ. क्र. | विषय | सर्वसाधारण | महिला | सर्वसाधारण | महिला | सर्वसाधारण | महिला | सर्वसाधारण | महिला | सर्वसाधारण | महिला | सर्वसाधारण | महिला | सर्वसाधारण | महिला | सर्वसाधारण | महिला | सर्वसाधारण | महिला | सर्वसाधारण | महिला | खेळाडू / प्रवर्ग | | |
| 1 | शरीररचनाशास्त्र | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | 1 | - | - | - | 1 | - | - | 1 | 1 |
| 2 | जीवरसायनशास्त्र | - | - | - | 1 | - | - | - | - | - | - | - | - | - | - | 1 | - | 1 | - | 2 | 1 | - | 3 | 1 |
| 3 | विकृतीशास्त्र | - | - | - | - | - | - | 1 | - | - | - | - | - | - | 1 | - | - | - | - | 1 | 1 | - | 2 | 0 |
| 4 | न्यायवैद्यकशास्त्र | - | - | - | - | - | 1 | 1 | - | - | - | - | - | - | - | - | - | 1 | - | 2 | 1 | - | 3 | 1 |
| 5 | औषधवैद्यकशास्त्र | - | - | 1 | 1 | 1 | - | - | - | 1 | 1 | 1 | - | 1 | - | 2 | 1 | 2 | 2 | 9 | 5 | 1/ इमाव | 15 | 1 |
| 6 | बालरोगचिकित्साशास्त्र | - | - | - | 1 | - | - | - | - | - | - | - | - | - | - | 1 | - | 1 | - | 2 | 1 | - | 3 | 1 |
| 7 | स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र | - | - | 1 | - | 1 | - | - | - | - | - | - | - | - | - | 1 | 1 | 3 | 1 | 6 | 2 | - | 8 | 2 |
| 8 | बधिरीकरणशास्त्र | - | - | 4 | 2 | 1 | - | 1 | 1 | 1 | 1 | - | - | 1 | 1 | 4 | 1 | 7 | 2 | 19 | 8 | 1/ इमाव | 28 | 3 |
| 9 | सामाजिक वैद्यकशास्त्र | - | 1 | - | - | - | - | - | - | - | - | - | - | 1 | - | 1 | - | 3 | 1 | 5 | 2 | - | 7 | 1 |
| 10 | मनोविकृतीशास्त्र | - | - | - | - | - | 1 | - | - | - | - | - | - | - | - | - | - | 1 | - | 1 | 1 | - | 2 | 1 |
| 11 | क्ष- किरणशास्त्र | 1 | 1 | 1 | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | 3 | 1 | 5 | 2 | - | 7 | 1 |
| 12 | त्वचा व गुप्तरोगशास्त्र | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | 1 | 1 | 2 | - | 3 | 1 | - | 4 | 1 |
| 13 | सर्वसाधारण शल्यचिकित्साशास्त्र | - | 1 | - | - | - | - | 1 | - | - | - | - | - | - | - | 1 | - | 2 | 1 | 4 | 2 | - | 6 | 2 |
| 14 | नेत्रशल्यचिकित्साशास्त्र | - | - | - | 1 | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | 1 | - | 1 | 1 | - | 2 | 1 |
| 15 | श्वसनविकारशास्त्र | - | - | - | 1 | 1 | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | 1 | - | 2 | 1 | - | 3 | 1 |
| 16 | जीवसांख्यिकीशास्त्र | - | - | 1 | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | 1 | - | - | 1 | - |
| 17 | रेडीओथेरेपी | - | - | 1 | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | 1 | - | - | 1 | - |

**<u>शैक्षणिक अर्हता :</u>**

(1) **<u>वैद्यकीय</u>** :- (1) भारतीय आयुर्विज्ञान परिषदेने वैद्यकीय संस्थामधील शिक्षकांसाठी तयार केलेल्या न्यूनतम शैक्षणिक अर्हता नियमावली 1998 मधील अनुसूची 1 मध्ये नमूद केल्यानुसार वैद्यकीय विशेष आणि वैद्यकीय अतिविशेष या विषयांकरिता नमूद केलेल्या पदव्या / पदव्युत्तर पदव्या धारण केलेल्या असाव्यात.

किंवा

भारतीय आयुर्विज्ञान परिषदेने वैद्यकीय संस्थामधील शिक्षकांसाठी तयार केलेल्या न्यूनतम शैक्षणिक अर्हता नियमावली 1998 मधील अनुसूची दोन मध्ये विहीत केलेल्या तत्सम शैक्षणिक अर्हता

आणि

(2) मान्यताप्राप्त वैद्यकीय महाविद्यालयात निवासी / प्रबंधक / प्रपाठक / पाठयनिर्देशक म्हणून 3 वर्षे संबंधित विषय (ज्या विषयासाठी अर्ज केलेला असेल) शिकवण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.

**(ब) <u>जीवसांख्यिकीशास्त्र</u> :** (1) भारतीय आयुर्विज्ञान परिषदेने अनुसूचि दोन मध्ये विहीत केल्यानुसार न्यूनतम अर्हता 1998 च्या वैद्यकीय संस्था नियमावलीनुसार उमेदवाराने संबंधित विषयात एम.एस.सी. पदवी प्राप्त केलेली असावी. (2) मान्यताप्राप्त वैद्यकीय महाविद्यालयात निवासी / प्रबंधक/ प्रपाठक / पाठयनिर्देशक म्हणून 3 वर्षे संबंधित विषय शिकविण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.

**<u>बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उपनगरीय रूग्णालयांमध्ये बंधपत्रित सेवा पूर्ण केलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.</u>**

**<u>वेतनश्रेणी</u>** - सहाय्यक प्राध्यापक: रु. 15600-39100 अधिक रु. 6000 श्रेणी वेतन + नेहमीचे भत्ते

**<u>वयोमर्यादा</u>** - अगोदरच मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत नियमित तत्वावर **कार्यरत** नसल्यास उमेदवाराचे वय खुल्या प्रवर्गासाठी 35 वर्षांपेक्षा अधिक नसावे व मागासवर्गीयांकरिता 40 वर्षांपेक्षा अधिक नसावे**.**

**BRIHANMUMBAI MAHANAGARPALIKA**

**MUNICIPAL MEDICAL STAFF SELECTION BOARD**

## Criteria for the interview of Asst. Professor

| | |
|---|---|
| 1. **Panel :** | **Total marks 30** |
| 2. **Qualification:** | **Total marks 25** |
| a) Possessing Minimum prescribed qualifications | 20 |
| b) For possessing additional qualifications | |
| Additional University Degree- DNB/ Phd | 3 |
| Additional University Diploma/Fellowship | 2 |
| Deduction : | |
| Passing qualifying exam. with IInd or more attempts. Similar deductions to be made in respect of higher qualifications. | 2 per attempt. |
| 3. **Experience:** | **Total marks 25** |
| a) Possessing Minimum Prescribed experience | 12 |
| b) For additional experience | 4 per year of experience ( 2 per 6 months term) |
| 4. **Prizes:** | **Total marks 10** |
| Prizes at University level | 3 per prize |
| Prizes at college level or National conferences | 1 per prize subject to maximum of 3 |

The prizes for academic achievements only, to be considered.

| | |
|---|---|
| 5. **Publications:** | **Total marks 10** |
| in standard Indexed journals – Original articles | |
| International | 3 per publication |
| National | 2 per publication |
| In non-standard journals / case reports | 1 per publication subject to maximum of 2 |

The articles accepted for publication should be taken into consideration if sufficient proof for acceptance of the articles is produced before the Chairman of the Board

**<u>सर्वसाधारण अटी</u> :**

1) रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार आणि आवश्यकतेनुसार नेमणूका करण्यात येतील. तथापि निवड यादी कोणत्याही वेळी पूर्व सूचना न देता रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत.

2) जाहीरातीमध्ये दिलेल्या पदांची संख्या व अनुशेष बदलण्यासापेक्ष आहेत.

3) विहीत नमुन्यातील आवदेन पत्र स्वहस्ताक्षरात भरावेत व सर्व दृष्टीने पूर्ण असावेत. विहीत नमुन्यामध्ये नसलेले व अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

4) अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत असलेल्या एखादया कर्मचा-याला अर्ज करावयाचा असेल तर त्याने / तिने त्याच्या / तिच्या खातेप्रमुखांचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

5) अलिकडच्या काळात काढलेले पारपत्र आकारातील उमेदवाराचे छायाचित्र त्याच्या स्वाक्षरीसह अर्जावर नमूद केलेल्या ठिकाणी चिकटवावे.

6) उमेदवारांनी स्वतः निश्चित करावयाचे आहे की ते आवेदीत पदांच्या सर्व अर्हता व अटी पूर्ण करतात. उमेदवार विहीत अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी व कुठल्याही टप्प्यावर निर्दशनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्र व्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

7) पत्र व्यवहाराचा पत्ता सुस्पष्ट व पिनकोडसहीत पूर्ण असावा. सोबत दूरध्वनी व भ्रमणध्वनी क्रमांक अर्जावर नमूद करणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे ई मेल आयडीसुद्धा नमूद करावा.

8) सहाय्यक प्राध्यापक या पदाकरिता अर्ज करणा-या उमेदवारांना संगणकाचे ज्ञान अवगत करणे आवश्यक आहे. त्याने / तिने डीओईएसीसी सोसायटीचे `सी.सी.सी.' किंवा `ओ' स्तर किंवा `ए' स्तर किंवा `बी' स्तर किंवा `सी' स्तर प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केलेली असणे आवश्यक आहे किंवा त्यांनी महाराष्ट्र राज्य व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांची `एम.एस.सी.आय.टी.' किंवा `जी.ई.सी.टी.' ही परीक्षा उत्तीर्ण केलेली असणे आवश्यक आहे किंवा नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या कालावधीत उपरोक्त संगणक अर्हता प्राप्त करणे आवश्यक आहे अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

9) परिपत्रक क्र. एमपीएम / 2 / 7984 दिनांक- 20.06.2016 नुसार उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षा 50 गुणांचा मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.

अ) `` उमेदवार प्रथम नियुक्तीच्या वेळी उपरोक्त मराठी भाषेची परीक्षा उत्तीर्ण नसल्यास त्या उमेदवाराची नियुक्ती प्रथम 2 वर्षासाठी मराठी भाषा उत्तीर्ण होण्यासापेक्ष तात्पुरत्या स्वरूपाची असेल.''

ब) `` उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मराठी भाषा हा विषय घेवून किंवा महानगरपालिकेमार्फत घेण्यात येणारी मराठी भाषेची परीक्षा प्रथम वार्षिक वेतनवाढ मिळण्यापूर्वी उत्तीर्ण न झाल्यास त्यास वार्षिक वेतनवाढ देण्यात येणार नाही. तथापि, उमेदवार नियुक्तीपासून 2 वर्षाच्या कालावधीत मराठी भाषेची परीक्षा उत्तीर्ण झाले तर त्यांना देय असलेली वार्षिक वेतनवाढ देखील मराठी भाषेची परीक्षा उत्तीर्ण झाल्यापासून पूर्वलक्षी प्रभावाने देण्यात येईल.''

क) `` सदर उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मराठी भाषा हा विषय घेवून किंवा महानगरपालिकेमार्फत घेण्यात येणारी मराठी भाषेची परीक्षा नियुक्तीपासून 2 वर्षांच्या कालावधीत उत्तीर्ण न झाल्यास त्याची सेवा खंडीत करण्यात येईल.''

10) इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवाराचा आरक्षित पदांकरिता विचार केला जाणार नाही. सदर आरक्षण विषयक नियम हे केवळ महाराष्ट्र राज्यात अधिवास करणा-या उमेदवारांनाच लागु आहेत.

11) उमेदवारांनी शाळा सोडल्याचा दाखला, जन्म दाखला, अधिवास प्रमाणपत्र, शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे, माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण झाल्याबाबतची गुणपत्रिका, सक्षम अधिका-यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नविनतम प्रमाणपत्र यांच्या साक्षांकीत छायांकित प्रती वैयक्तीक अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. विवाहीत महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहीत महिला उमेदवार विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करू शकतात. पदवी पूर्वपरीक्षा व पदवी परीक्षा एकापेक्षा जास्त प्रयत्नात उत्तीर्ण केली असल्यास ती परीक्षा किती प्रयत्नात उत्तीर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

12) उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अधःपतन किंवा फौजदारी स्वरूपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास तो नियुक्तीसाठी अपात्र ठरेल. उमेदवाराने पोलिस स्टेशनकडून चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास / शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने संबंधित पोलिस स्टेशनकडून ``ना हरकत प्रमाणपत्र " सादर करणे अनिवार्य आहे.

13) निवड झालेल्या उमेदवारांना संबंधीत पदावर नियुक्ती करण्यापूर्वी 1 महिन्याच्या वेतनाएवढी रोख रक्कम सुरक्षा अनामत म्हणून भरावी लागेल किंवा तशा अर्थाचे (आशयाचे) जामीनपत्र सादर करावे लागेल. सदर भरलेली सुरक्षा अनामत रक्कम भरुनसुध्दा महानगरपलिकेमध्ये नेमणूक न स्विकारल्यास किंवा परिविक्षाधीन कालावधीत नोकरी सोडल्यास किंवा काही कारणास्तव बडतर्फ केल्यास त्यांनी भरलेल्या अनामत रक्कमेचा त्यांना परतावा मिळण्याचा हक्क राहणार नाही.

14) निवड झालेल्या उमेदवाराची नियुक्ती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही वैद्यकीय महाविद्यालयात/ रूग्णालयात करण्यात येईल व त्याची महानगरपालिकेतील कोणत्याही वैद्यकीय महाविद्यालयात/ रूग्णालयात आवश्यकतेनुसार बदली करण्यात येईल.

15) निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहीती / प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहीती दडवून ठेवल्याचे निर्दशनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झालेली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

16) निवड झालेल्या उमेदवारास नियुक्ती नंतर मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम 1989 तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम 1999 वेळोवेळी होणा-या सुधारणेनुसार लागू होतील.

17) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती नंतर नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू होईल. सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना म्हणजेच मुंबई महानगरपालिका निवृत्ती वेतन नियम 1953 आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

18) निवड झालेल्या उमेदवाराची नियुक्ती तीन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल व तीन वर्षानंतरचे सेवासातत्य, परिविक्षाधीन कालावधीतील कामगिरीवर अवलंबून असेल.

19) विजा (अ), भज (ब), भज (क), भज (ड) या प्रवर्गाकरिता विहीत केलेले आरक्षण त्या त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनीय आहे.

20) अजा आणि अज प्रवर्गातील उमेदवार वगळता अन्य मागास प्रवर्गातील उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे नविनतम प्रमाणपत्र भरतीच्या वेळेस अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. तसेच महिला आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिका-यांचे नविनतम प्रमाणपत्र भरतीच्या वेळेस अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

21) परिपत्रक क्र. एमबीसी / 7100 दिनांक- 31.01.2012 नुसार मागासवर्गीय उमेदवारकडे नियुक्तीचे वेळी जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास सबधित उमेदवार नियुक्ती नंतर सहा महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करु शकेल.

नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांका पासून सहा महिन्यांच्या आंत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता सबधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहिल.

उमेदवाराने नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव सबधित जात पडताळणी समितीकडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोच पावतीची साक्षांकित प्रत नियुक्ती प्राधिका-यास सादर करावी.

22) अपंग उमेदवाराने किमान 40 टक्के अपंगत्व असल्याबाबत सक्षम प्राधिका-यांनी दिलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकीत छायांकीत प्रत अर्जासोबत जोडावी.

23) निवड झालेल्या उमेदवाराविरूद्ध कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिद्ध झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलिस ठाण्याकडून प्राप्त झाल्यानंतरच त्याची सदर पदावर नेमणूक केली जाईल.

24) उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थितीत रहावे लागेल.

25) उमेदवार नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियोक्त्याचे `ना हरकत प्रमाणपत्र' अर्जासोबत जोडावे.

26) प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव निवड प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.

27) शासकीय सक्षम प्राधिका-याकडून किमान 40 टक्के अपंगत्व असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केलेल्या व निवड झालेल्या निःसमर्थ असलेल्या उमेदवारांना मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय मंडळाकडे पाठविले जाईल व मुंबई महानगरपालिका वैद्यकीय मंडळाने सदर निःसमर्थ असलेले उमेदवार सहाय्यक प्राध्यापक पदाचे कर्तव्य बजावण्यास अपंगत्वाच्या दृष्टीकोनातून शारीरीक दृष्टया पात्र ठरविल्यानंतरच त्यास प्रत्यक्ष नेमणूक देण्यात येईल.

28) समांतर आरक्षणांतर्गत अर्ज करू इच्छिणा-या उमेदवारांनी संबंधित समांतर आरक्षणाच्या दृष्टीकोनातून शासकीय निर्देशानुसार सक्षम प्राधिका-याकडून प्राप्त केलेले प्रमाणपत्र व त्याच्या साक्षांकीत छायाप्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

29) परिपत्रक क्र. एमबीसी/ 843 दिनांक - 30.11.2008 मधील शासन निर्देशानुसार केंद्र शासनाचा ऑफिस मेमोरँडम मधील परिच्छेद क्र. 16 (ए,बी,सी) मधील तरतुदींनुसार निःसमर्थ असलेल्या व्यक्तींकरिता आरक्षित असलेली पदे उमेदवार उपलब्ध न झाल्यास रिक्त ठेवण्यात येतील.

30) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर महापालिकेचे सेवानिवासस्थान उपलब्ध करून देण्याची जबाबदारी प्रशासनाची राहणार नाही.

31) महिलांचे आरक्षण महिला व बालकल्याण विभागाच्या शा .नि. क्र. 82 / 2001 / मएसा / प्रक्र 415 / का - 2 दिनांक - 25.05.2001 मधील तरतुदीनुसार राहील.

32) खेळाडू आरक्षणांतर्गतची पदे भरण्याकरिता महाराष्ट्र शासनाच्या दिनांक- 30.04.2005 च्या शासन निर्णय क्र. राक्रिधो - 2002 / प्र.क्र. 68 / क्रीयुसे - 2 मध्ये विहीत केलेल्या अटी व शर्तीनुसार अत्युच्च गुणवत्ताधारक स्त्री व पुरूष खेळाडूंमधून भरण्यात येतील.

33) विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास प्रवर्ग या राखीव असलेल्या पदावर नियुक्तीसाठी अर्ज करणा-या उमेदवारांकडे नविनतम नॉन- क्रिमी लेयर प्रमाणपत्र असावे.

34) निवड समितीने तयार केलेली निवडसूची एक वर्षासाठी किंवा नविन भरती प्रक्रियेसाठी जाहीरात देण्यात येईल त्या दिनांकापर्यंत किंवा दोन्हीपैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राहय ठरेल त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

35) निःसमर्थ असलेल्या उमेदवारांकरिता आरक्षित असलेल्या पदांची शारीरीक पात्रता, जबाबदारी व कर्तव्ये

| अनु. क्र. | पदनाम | शारिरीक पात्रता | अपंगत्वाचा प्रकार | | | कामाचा प्रकार / जबाबदारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | अंधत्व श्रीणदृष्टी | चलनवलन विषयक विकलांगता | श्रणवशक्तीतील दोष | |
| 1 | सहाय्यक प्राध्यापक<br>शरीररचनाशास्त्र,<br>जीवरसायनशास्त्र<br>विकृतीशास्त्र,<br>न्यायवैद्यकशास्त्र,<br>सामाजिक वैद्यकशास्त्र,<br>औषधवैद्यकशास्त्र,<br>बालरोगचिकित्साशास्त्र,<br>स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र,<br>बधिरीकरणशास्त्र,<br>मनोविकृतीशास्त्र,<br>क्ष-किरणशास्त्र,<br>त्वचा व गुप्तरोगशास्त्र,<br>सर्वसाधारण शल्यचिकित्साशास्त्र,<br>नेत्रशल्यचिकित्साशास्त्र,<br>श्वसनविकारशास्त्र | S - बसणे<br>ST- उभे राहणे<br>KC- टेकणे<br>MF- बोटांची हालचाल करणे.<br>SE- बघणे<br>C- संवाद साधणे | - | OL- अस्थिव्यंग | - | महाविद्यालयातील विज्ञान विषयातील एक किंवा दोन विषय शिकविणे, व्याख्यान देणे, संबंधीत क्षेत्र किंवा प्रयोगशाळेतील प्रात्यक्षिक कामाबाबत मार्गदर्शन आणि पर्यवेक्षण करणे. परीक्षेच्या प्रश्नपत्रिका तयार करणे. परीक्षेचे आयोजन करणे आणि गुण देणे. वर्गाची नोंदवहीत नियमित नोंद घेणे आणि संशोधन कार्यासाठी मार्गदर्शन करणे. विद्यार्थ्यांना वैद्यकशास्त्र विषयाअनुषंगाने शिकविणे, प्रात्यक्षिक, चिकित्सालयीन प्रशिक्षणाचे पर्यवेक्षण करणे.<br>प्रशिक्षण, रूग्ण तपासणी, चिकित्सालयीन तपासण्यासंबंधी पर्यवेक्षक म्हणून तसेच औषधोपचार देणे, त्यांच्या नोंदी ठेवणे आणि संशोधनाच्या कामाचे आयोजन व मार्गदर्शन करणे.<br>विद्यार्थ्यांना शिकविण्याव्यतिरिक्त त्यांनी शस्त्रक्रिया करणे, रूग्णनिदान औषधोपचार आणि शस्त्रकियेनंतरची औषधोपचार करणे. संशोधन कार्याचे आयोजन करणे आणि वैद्यकीय तसेच विशेषकृत शस्त्रक्रिया अद्ययावत करणे.<br>शिकविण्याव्यतिरिक्त आणि संबंधीत विषयाबाबत वैद्यकीय सल्लागारांच्या पर्यवेक्षणाखाली रूग्णतपासणी, संबंधीत क्षेत्रातील रोगनिवारक उपचाराबाबत व्यवस्था पाहणे व त्याच्या नोंदी ठेवणे. संशोधन कार्याचे आयोजन करणे किंवा संशोधन कार्यात सहकार्य करणे. |

**विशेष सूचना**

• यापूर्वी संबंधित कार्यालयात वा अन्य ठिकाणी सादर केलेले / प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

• जर एखादया उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

• मध्यस्थ / ठक / मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणा-या व्यक्ती, यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध रहावे.

• जाहीरातीची सूचना त्याचप्रमाणे मुलाखतीचा कार्यक्रम सर्व चारही वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये सूचना फलकांवर लावण्यात येईल. पात्र उमेदवारांस मुलाखतीचे रितसर पत्र पाठविण्यात येईल. परंतु जर पत्र मिळाले नाही तरी पात्र उमेदवारांना सूचना करण्यात येते की, त्यांनी चारही वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये मुलाखतीच्या कार्यक्रमाची सूचना फलकावरील सूचना अवगत करून मुलाखतीस उपस्थित रहावे.

**विहित नमुन्यातील (अ) आणि (ब) विषयांकरिता असलेले अर्ज खालील कार्यालयात उपलब्ध आहेत.**

**(अ) व (ब) वैद्यकीय विशेष व अतिविशेष :**

1) अधिष्ठाता, सेठ गो. सु. वैद्यकीय महाविद्यालय व के. ई. एम. रूग्णालय, यांचे कार्यालय, परळ, मुंबई - 400 012

2) अधिष्ठाता, टो. रा. वैद्यकीय महाविद्यालय व बा. य. ल. नायर धर्मा. रूग्णालय, यांचे कार्यालय, मुंबई सेंट्रल, मुंबई - 400 008

3) अधिष्ठाता, लो. टि. वैद्यकीय महाविद्यालय व लो. टि. म. स. रूग्णालय, यांचे कार्यालय, सायन, मुंबई - 400 022

सदर अर्ज दिनांक- 11.12.2017 ते 26.12.2017 पर्यंत कार्यालयीन वेळेत सकाळी- 11.00 ते दुपारी- 03.00 वाजेपर्यंत दुसरा व चौथा शनिवार, रविवार आणि सर्व सार्वजनिक सुट्टया वगळून, आरक्षित गटाकरिता रूपये 200 /- अधिक वस्तू व सेवाकर (जीएसटी) व सर्वसाधारण गटाकरिता रूपये 300/- अधिक वस्तू व सेवाकर (जीएसटी) एवढी रक्कम रोखीने भरल्यावर उपलब्ध होऊ शकतील. अर्ज टपालाने पाठविले जाणार नाहीत. प्रत्येक विषयाकरिता स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे.

-

**<u>अर्ज सादर करण्याचा कार्यालयीन पत्ता :</u>**

**<u>(अ) व (ब) वैद्यकीय विशेष व अतिविशेष विषयांकरिताचे अर्ज :</u>**

1) अधिष्ठाता, टो. रा. वैद्यकीय महाविद्यालय व बा. य. ल. नायर धर्मा. रूग्णालय, यांचे कार्यालय, मुंबई सेंट्रल, मुंबई - 400 008

**<u>अर्ज स्विकारण्याचा दिनांक, वेळ आणि ठिकाण</u>** - दिनांक- 11.12.2017 ते 26.12.2017 पर्यंत कार्यालयीन वेळेत सकाळी- 11.00 ते दुपारी- 04.30 वाजेपर्यंत दुसरा व चौथा शनिवार, रविवार आणि सर्व सार्वजनिक सुट्टया वगळून. टो. रा. वैद्यकीय महाविद्यालय व बा. य. ल. नायर धर्मा. रूग्णालय, तळ मजला, आवक- जावक विभाग, मुंबई सेंट्रल, मुंबई - 400 008.

अर्ज सादर करण्याचा शेवटचा दिनांक. 26.12.2017 रोजी दुपारी 4.30 वाजेपर्यंत विहीत तारीख / वेळेनंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही व त्याबाबतीतील कुठल्याही प्रकारचा पत्रव्यवहार स्विकारला जाणार नाही.

**सही/-**

**संचालक (वै.शि. व प्र.रू.)**

**अध्यक्ष**

**महानगरपालिका वैद्यकीय कर्मचारी निवड मंडळ आणि**
**अधिष्ठाता रा.ए.स्मा. रुग्णालय व गो.सु.वैद्यकीय महाविद्यालय**

**मुंबई**
**दिनांक - 07.12.2017**